Pimpri Chinchwad Police Commissionerate

# प्रेसनोट

## वाकड पोलीस ठाणे हद्दितील सराईत गुन्हेगार नामे, सुनिल विश्वनाथ ठाकुर याचे टोळीवर मोका ( महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ ) अंतर्गत कारवाई केले बाबत.

श्री. विवेक मुगळीकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकड पोलीस ठाणे यांनी श्री. आनंद भोईटे, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-२ यांचे मार्फतीने वाकड पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. १५४/२०२१ भा.दं.वि. कलम ३०७, ३२४, ३४. म.पो. का.क. ३७ (१) (३) सह १३५ चे तपासामध्ये आरोपी नामे, **(१)** सुनिल विश्वनाथ ठाकुर, वय २३ वर्षे, रा. जय मल्हार नगर, थेरगांव, पुणे, **(टोळी प्रमुख) (२)** विजय राहुल तलवारे, वय १९ वर्षे, रा. अमरदिप कॉलनी, रहाटणी, पुणे, यांचेविरूध्द **जबर दु:खापत करणे, जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, बेकायदेशीर जमाव जमवुन घरात घुसुन सामानांची तोडफोड व नुकसान करुन दहशत माजवुन नागरिकांच्या खिडकीच्या काचा फोडुन नुकसान करुन नाहक त्रास देणे, मारहाण करुन जबरी चोरी, बेकायदेशिर जमाव जमवुन घातक शस्त्रांनी दहशत निर्माण करणे असे एकुण ०७ गुन्हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दितील हिंजवडी, सांगवी व वाकड पोलीस ठाणेस दाखल असल्याचे** तसेच वरील सर्व आरोपी यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवून हिंसाचाराचा वापर करून वर्चस्वासाठी व आर्थिक फायद्यासाठी संघटितपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अंतर्गत कारवाई करणे बाबत प्रस्ताव अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांचेकडे पाठविला होता. श्रीमती. प्रेरणा कट्टे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-२, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. संजय तुंगार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा (अतिरीक्त कार्यभार), पिंपरी चिंचवड यांनी सदर प्रस्तावा मधील कागदपत्रांची छाननी करून त्रुटींची पूर्तता करून सदरचा प्रस्ताव आदेश पारीत करणे कामी मा. अपर पोलीस आयुक्त सो. पिंपरी चिंचवड यांचेकडे पाठविला असता दिनांक २९/०३/२०२१ रोजी मा. श्री. रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश पारीत केलेले आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. रामनाथ पोकळे सो, मा. श्री. आनंद भोईटे सो., पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१, श्रीमती. प्रेरणा कट्टे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली, डॉ. संजय तुंगार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा (अतिरीक्त कार्यभार), श्री. विवेक मुगळीकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकड पोलीस ठाणे, तसेच अंमलदार पोलीस हवालदार सचिन चव्हाण, पी.सी.बी. गुन्हे शाखा, स.पो.फौ. सुहास पाटोळे, वाकड पोलीस ठाणे, यांचे पथकाने केली आहे.

**( रामनाथ पोकळे )**
पोलीस उप-महानिरीक्षक तथा
अपर पोलीस आयुक्त
पिंपरी चिंचवड.